आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३०वाजता
१९  एप्रिल २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- गेल्या आर्थिक वर्षात भारताच्या औषध उत्पादन निर्यातीने ओलांडला  ३० अब्ज डॉलर्सचा टप्पा

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या मंगळवारी सौदी अरेबियाच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर

- आयआयटी - जेईई मुख्य प्रवेश परीक्षेच्या  सत्र-२ चे निकाल जाहीर / सर्वोत्कृष्ट १०० पर्सेंटाईल मिळवणाऱ्यात महाराष्ट्रातले ३ विद्यार्थी.

**आणि**

- इराणच्या महत्त्वाकांक्षी अणुकार्यक्रमाबाबत ओमानच्या मध्यस्थीने अमेरिका आणि इराण यांच्यात आज चर्चेची नवी फेरी

**<><><><><>**

आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये भारताच्या औषध निर्यात क्षेत्रानं  ३० अब्ज डॉलर्सचा टप्पा पार केला असून यापैकी एक तृतीयांश पेक्षा जास्त वाटा अमेरिकी बाजारपेठेचा आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या तुलनेत भारताच्या औषध निर्यातीनं ९ टक्क्यांहून जास्त वृद्धी नोंदवली असून, या काळात अमेरिकेत झालेल्या निर्यातीमध्ये १४ टक्के वाढ दिसून आली आहे. गेल्या आर्थिक वर्षात भारतातून सर्वाधिक औषध निर्यात झालेल्या देशांमध्ये युके, ब्राझील, फ्रान्स आणि दक्षिण आफ्रिकेचाही समावेश आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या मंगळवारी सौदी अरेबियाच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. सौदी अरेबियाचे युवराज आणि प्रधानमंत्री प्रिन्स मोहम्मद बिन

सलमान यांच्या निमंत्रणावरून मोदी ही भेट देणार असून त्यांचा हा तिसरा दौरा असेल. भारत आणि सौदी अरेबियामध्ये घनिष्ठ आणि मैत्रीपूर्ण संबंध असून परस्परांमध्ये सामाजिक, सांस्कृतिक आणि व्यापारी संबध देखील प्राचीन काळापासून आहेत. राजकीय, संरक्षण, सुरक्षा, गुंतवणूक, ऊर्जा, तंत्रज्ञान, आरोग्य, शिक्षण या सर्व क्षेत्रात दोन्ही देशांमध्ये धोरणात्मक भागीदारी आहे, तसंच गेल्या काही दशकांपासून संबंध अधिक मजबूत झाले आहेत. प्रधानमंत्री मोदी यांच्या सौदी अरेबियाच्या भेटी दरम्यान परस्पर हिताच्या विविध प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर चर्चा होणार आहे, तसंच उभयदेशांच्या हितासाठी विचारांची देवाणघेवाण होणार आहे.

**<><><><><>**

२०४७ पर्यंत विकसित भारताचं स्वप्न साकारण्यासाठी प्रत्येकानं आपल्या आरोग्याची काळजी घ्यायला हवी असं आवाहन केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी केलं आहे. यकृत दिनाचं महत्व सांगण्यासाठी आज नवी दिल्ली इथल्या यकृत आणि पित्त विज्ञान संस्थेत, आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. निरोगी यकृत हा निरोगी शरीराचा पाया असून प्रत्येकानं त्यादृष्टीने आहार आणि व्यायाम यावर लक्ष द्यावं असं ते म्हणाले.

यकृताच्या आजारांबद्दल जागृती वाढवण्यासाठी आणि तेलकट, चरबीयुक्त अन्न टाळून निरोगी जीवनशैली स्वीकारायला प्रोत्साहन देण्यासाठी आज जागतिक यकृत दिवस साजरा होत आहे. ‘अन्न हेच औषध आहे’, ही यंदाच्या जागतिक यकृत दिनाची संकल्पना आहे.

यकृताचे आजार हे भारतात मृत्यूसाठी कारणीभूत ठरणाऱ्या १० प्रमुख घटकांपैकी एक असल्याचं जागतिक आरोग्य संघटनेनं म्हटलं आहे. हेपॅटायटीस बी, सी आणि हेपॅटोसेल्युलर कार्सिनोमा यासारखे यकृताचे आजार बहुतेकदा अल्कोहोल आणि ड्रग्जचं अती सेवन, आरोग्यासाठी घातक अन्नाचं दीर्घकाळ सेवन, बैठी जीवनशैली

आणि व्यायामाचा अभाव, यासारख्या चुकीच्या जीवनशैलीमुळे होतात,असं अभ्यासातून स्पष्ट झालं आहे.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात नवी क्रीडा संस्कृती उदयाला आली आहे, असं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केलं आहे. लखनऊ इथं आज संसद खेल महाकुंभाचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. केंद्र सरकार आणि उत्तरप्रदेश राज्य सरकारने क्रीडास्नेही धोरण  स्वीकारलं आहे, यामुळे छोट्या छोट्या खेड्यातल्या तरुणांना आपली प्रतिभा सिद्ध करण्याची संधी मिळाली आहे, असं राजनाथ सिंह यावेळी म्हणाले. २०३६ या वर्षात गुजरात मधे होणाऱ्या ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेच्या आयोजनासाठी सरकार पूर्ण प्रयत्न करत आहे, असं सिंह यांनी सांगितलं.

**<><><><>**

अपेडा, अर्थात कृषी आणि प्रक्रियाकृत अन्न उत्पादन निर्यात प्राधिकरणानं महाराष्ट्रातून अमेरिकेला भारतीय डाळिंबाच्या व्यावसायिक निर्यातीची पहिली खेप पाठवली आहे. मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात सागरी मार्गानं भगवा जातीच्या भारतीय डाळिंबाच्या सुमारे १४ टन वजनाच्या ४ हजार ६२० पेट्यांची पहिली खेप अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावर पोहोचल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. भारताच्या ताज्या फळांच्या निर्यातीमधला हा महत्वाचा टप्पा असल्याचं यात म्हटलं आहे.

डाळिंबांचं शेल्फ लाईफ ६० दिवसांपर्यंत वाढवण्यासाठी अपेडानं ICAR - राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राच्या सहकार्यानं केलेलं  संशोधन यशस्वी ठरल्यामुळे भारतानं सागरी मार्गानं चाचणी स्तरावर डाळींब निर्यातीची पहिली खेप पाठवली.

**<><><><>**

एनटीए, अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेनं आज सकाळी जेईई मेन २०२५ प्रवेश परीक्षेच्या सत्र-२ चे निकाल जाहीर केले. यंदा, एकूण २४ विद्यार्थ्यांनी जेईई मेन २०२५ पेपर १ मध्ये १०० पैकी १०० पर्सेन्टाइल मिळवले आहेत. यामध्ये महाराष्ट्रातल्या सनिध्या सराफ, आयुष चौधरी आणि विशद जैन या तीन विद्यार्थ्यांचा समावेश आहे. परीक्षेचा निकाल कट-ऑफ यादीसह आता जेईई मेनच्या अधिकृत वेबसाइटवर उपलब्ध आहे.

एप्रिल २०२५ मध्ये झालेल्या जेईई मेन पेपर १ च्या सत्र दोन साठी एकूण ९ लाख ९२ हजार ३५० उमेदवारांनी परीक्षा दिली होती.

<><><><><>

भारताचा पहिला उपग्रह ‘आर्यभट्ट’ आज पन्नास वर्षं पूर्ण करत आहे. १९७५ मध्ये आजच्याच दिवशी प्रक्षेपित करण्यात आलेल्या या उपग्रहाचं नाव प्राचीन भारतातले गणितज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञ ‘आर्यभट्ट’ यांच्या नावावरून ठेवण्यात आलं होतं. भारतीय अंतराळ संशोधन संघटनेनं उभारलेला हा उपग्रह सोव्हिएत युनियनच्या मदतीनं प्रक्षेपित करण्यात आला होता. सौर भौतिकशास्त्र, वायूशास्त्र आणि क्ष-किरण खगोलशास्त्र यासारख्या शास्त्रांचा अभ्यास करणं, हा या उपग्रह प्रक्षेपित करण्याचा उद्देश होता. कक्षेत पाच दिवस घालवल्यानंतर आर्यभट्टनं मौल्यवान डेटा गोळा केला, त्याचबरोबर शास्त्रज्ञांना उपग्रह विकासात महत्वाचा अनुभव मिळाला. आर्यभट्ट या उपग्रहाच्या यशस्वी प्रक्षेपणामुळे अवकाश संशोधनात भारताच्या प्रवेशाची नोंद झाली त्यासह देशाच्या भविष्यातल्या अंतराळ मोहिमांचा पाया रचला.

<><><><><>

इराणच्या महत्त्वाकांक्षी अणुकार्यक्रमावरुन अनेक दशकं चाललेला वाद सोडवण्यासाठी अमेरिका आणि इराण यांच्यात आज चर्चेची नवी फेरी होत आहे. इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराक्ची आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प

यांचे मध्य पूर्वेतले प्रतिनिधी स्टीव विटकॉफ यांच्यात ओमान इथल्या मध्यस्थांच्या सहाय्याने अप्रत्यक्षपणे ही चर्चा होणार आहे. यापूर्वी मस्कत मध्ये झालेली चर्चेची पहिली फेरी सकारात्मक ठरली होती. दरम्यान, हे राजनैतिक प्रयत्न अपयशी ठरले, तर लष्करी कारवाईचा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी दिला आहे.
इराणनं युरेनियमचं उत्पादन थांबवावं, कारण अणुबॉम्ब बनवणं हे त्याचं उद्दिष्ट असल्याचं अमेरिकेचं मत आहे. तर आपला अणु कार्यक्रम पूर्णपणे शांततामय असल्याचा इराणचा दावा आहे.

**<><><><>**

लष्कर, वायुसेना आणि नौसेना या तीनही दलांसाठी संयुक्तपणे आयोजित भविष्यवेधी युद्धनीतीचा दुसरा अभ्यासवर्ग येत्या २१ एप्रिल ते ९ मे दरम्यान नवीदिल्लीत होणार आहे. आधुनिक काळातल्या युद्धनीतीसाठी सैन्याधिकाऱ्यांना तयार करण्याच्या हेतूने संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान यांच्या पुढाकारातून पहिला अभ्यासवर्ग गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये झाला होता. बदलत्या तंत्रज्ञानाच्या युद्धनीतीवर होणाऱ्या परिणामांवर या अभ्यासवर्गात विशेष भर दिला जाणार आहे.

**<><><><>**

मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात आज उष्ण आणि दमट हवामान राहील, तर उत्तर प्रदेश आणि पश्चिम राजस्थानच्या काही भागात धुळीचं वादळ येईल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे. राजस्थानमध्ये आज तीव्र ते अती तीव्र स्वरूपाची उष्णतेची लाट राहील, मात्र येत्या उद्यापासून ती ओसरेल असा अंदाज आहे.
हिमालय पर्वतरांगांचा पश्चिमेकडचा प्रदेश आणि लगतच्या वायव्य भारतात बहुतेक सर्व ठिकाणी उद्यापर्यंत मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल, तर जम्मू-काश्मीर, लडाख, गिलगिट बाल्टिस्तान, मुझफ्फराबाद आणि हिमाचल प्रदेशात तुरळक ठिकाणी आज जोरदार पाऊस पडेल.

ईशान्य आणि पूर्व भारतात पुढले चार दिवस जोरदार वारे आणि मेघगर्जनेसह हलक्या स्वरूपाचा पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज गुजरात टायटन्सचा सामना दिल्ली कॅपिटल्सशी होईल. अहमदाबाद इथं दुपारी साडेतीन वाजता हा सामना सुरु होईल. जयपूरमध्ये संध्याकाळी साडेसात वाजता होणाऱ्या दुसऱ्या सामन्यात, राजस्थान रॉयल्स आणि लखनौ सुपर जायंट्स आमने-सामने असतील.

//<><><><><>//